भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना सन २०१९-२० मध्ये राबविण्यासाठी अनुसुचित जाती प्रवर्गासाठी ₹ २७४.१०४ लक्ष(₹ दोन कोटी चौऱ्याहत्तर लक्ष दहा हजार चारशे फक्त) निधी अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर उपलब्ध करुन देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्र. फुंफला-२०१९/प्र.क्र.१०६/९-अे,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- १५ जुलै, २०१९

<u>वाचा:-</u> (१) कृषी व पदुम विभाग, शासन निर्णय क्रमांक: राफयो-२०१८/प्र.क्र.४७/९-अे, दिनांक ०६ जुलै, २०१८.
(२) संचालक (फलोत्पादन), कृषी आयुक्तालय, पुणे यांचे जा.क्र. कृआ/फलो-२/भा.फुं.फ.योजना/५३३/२०१९, दिनांक ९ मे, २०१९ चे पत्र.
(३) वित्त विभाग, परिपत्रक क्रमांक:अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दिनांक १ एप्रिल, २०१९
(४) कृषी व पदुम विभागाचे क्र. लेखानु-२०१९/प्र.क्र.२३/१९/२-अे, दिनांक ०८ एप्रिल, २०१९.
(५) कृषी व पदुम विभाग, शासन निर्णय क्रमांक: फुंफला-२०१९/प्र.क्र.८४/९-अे, दिनांक ३ जून, २०१९
(६) कृषी व पदुम विभाग, पत्र क्र. राफयो-२०१८/प्र.क्र.४७/९-अे, दिनांक ०१ जुलै, २०१९
(७) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक: अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दि.०८ जूलै, २०१९

<u>प्रस्तावना:-</u>

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत जे शेतकरी फळबाग लागवडीकरिता पात्र ठरु शकत नाहीत अशा शेतकऱ्यांसाठी राज्य शासनाने उपरोक्त वाचा येथील क्रमांक १ च्या शासन निर्णयान्वये भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना सुरु केली आहे. सदर योजना सन २०१९-२० मध्ये राबविण्यास उपरोक्त वाचा येथील ५ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सन २०१९-२० या वर्षी सदर योजनेची अंमलबजावणी करण्याकरिता लेखानुदानाद्वारे अनुसुचित जाती प्रवर्गासाठी ₹ ४५६.८४ लक्ष (₹ ४ कोटी छपन्न लक्ष चौऱ्याऐंशी हजार फक्त) इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आला आहे. सदरचा संपूर्ण निधी खर्च करण्यास सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने मान्यता दिली आहे. तथापि, उपरोक्त वाचा येथील क्रमांक ७ च्या परिपत्रकान्वये वित्त विभागाने सन २०१९-२० च्या प्रथम नऊमाहीकरिता आवश्यक असणारा अनिवार्य व कार्यक्रमांतर्गत खर्चाचा अर्थसंकल्पित निधी एकूण वार्षिक तरतूदीच्या ६० % च्या मर्यादेत बीम्स प्रमाणालीद्वारे वितरित केला जाईल असे स्पष्ट केले आहे. त्याअनुषंगाने सन २०१९-२० साठी अर्थसंकल्पित केलेल्या ₹ ४५६.८४ लक्ष निधीपैकी ६० % इतका निधी आयुक्त (कृषी) यांना अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याबाबत शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे..

शासन निर्णय:-

१. सन २०१९-२० मध्ये भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेची अंमलबजावणी करण्याकरिता अनुसुचित जाती प्रवर्गासाठी अर्थसंकल्पित केलेल्या ₹ ४५६.८४ लक्ष रक्कमेपैकी ६० % म्हणजे ₹२७४.१०४ लक्ष (₹दोन कोटी चौऱ्याहत्तर लक्ष दहा हजार चारशे फक्त) एवढा निधी आयुक्त (कृषी) यांना अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

२. सदर निधी खालील लेखाशिर्षांतर्गत चालू वर्षी अर्थसंकल्पित केलेल्या तरतूदीतून खर्ची टाकावा.
मागणी क्रमांक डी-३, २४०१- पिक संवर्धन,
(००) ७८९ अनुसुचित जाती घटक योजना,
(००) (३३) भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना-अनुसुचित जाती घटक कार्यक्रम
(२४०१A९०४) ३३ अर्थसहाय्य

३. सदर योजना राबविताना यापूर्वी निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील तरतूदी व मार्गदर्शक सूचनेनुसार कार्यवाही करावी.

४. सदर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या तरतूदीतून फक्त अनुसुचित जाती व नवबौध्द घटकातील लाभार्थ्यांनाच लाभ देण्यात येईल याची दक्षता घ्यावी.

५. निधी खर्च करताना महाराष्ट्र अर्थसंकल्प नियम पुस्तिका व वित्तीय अधिकार नियम पुस्तिकेमध्ये उल्लेख केलेल्या तसेच नियोजन व वित्त विभागाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना व प्रचलित अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन करावे.

६. हा शासन निर्णय वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक: अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दिनांक १ एप्रिल, २०१९ व वित्त विभाग, परिपत्रक क्रमांक: अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दिनांक ८ जुलै, २०१९ मधील अटी व शर्तीचे अनुपालन करण्याच्या अटीच्या अधीन राहून प्रशासकीय विभागास प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१९०७१६११५५५८२४०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Digitally signed by Ashok Maroti Atram
Date: 2019.07.16 12:04:22 +05'30'

(अशोक आत्राम)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. मंत्री (रोजगार हमी व फलोत्पादन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
२) मा. मंत्री (कृषी) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
३) मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद, विधानमंडळ सचिवालय, मुंबई-३२
४) मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा, विधानमंडळ सचिवालय, मुंबई-३२
५) मा. राज्यमंत्री (कृषी व फलोत्पादन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
६) मा. सर्व विधानपरिषद/विधानसभा सदस्य, महाराष्ट्र राज्य.
७) अप्पर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
८) अप्पर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
९) प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१०) सचिव (कृषी) यांचे वरीष्ठ स्वीय सहायक, कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
११) आयुक्त (कृषी), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

१२) सह सचिव (फलोत्पादन), कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१३) संचालक (फलोत्पादन), कृषी आयुक्तालय, पुणे.
१४) सर्व विभागीय कृषी सह संचालक, महाराष्ट्र राज्य.
१५) सर्व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, महाराष्ट्र राज्य,
१६) महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा परीक्षा) मुंबई/नागपूर.
१७) संचालक, लेखा व कोषगार अधिकारी, मुंबई (२ प्रती)
१८) सह संचालक, लेखा व कोषागारे (संगणक कक्ष), नवीन प्रशासन भवन, ५ वा मजला, मुंबई-३२
१९) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य.
२०) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२१) निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई.
२२) माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई-३२
२३) कार्यासन ९-अे, निवड नस्ती.